**भगिनी मंडळ चोपडा संचलित,**

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

## -महाविद्यालयातील चालू-घडामोडी अहवाल-२०२२-२३ -

**दिनांक- 01/08/2022- वृक्षारोपण कार्यक्रम-**

समाजकार्य मविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनमताई गुजराथी यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आली. विविध वृक्षांची लागवड आवारात करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमास मविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सौंदाणकर,विभाग प्रमुख डॉ.अनंत देशमुख, विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. नारसिंग वळवी, रासेयो विभाग प्रमुख डॉ.राहूल निकम व हजर होते.



**दिनांक- 01/08/2022- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी कार्यक्रम तसेच स्वा.अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी कार्यक्रम** -समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी



**दिनांक-09/08/2022- जागतीक  आदिवासी दिन कार्यक्रम** इ
कार्यक्रम प्रसंगी समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी




**दिनांक-12 ऑगस्ट 2022- 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस'** ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या 130 व्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



**दिनांक-09/08/2022- स्वराज्य महोत्सवानिमित्ताने सामुहीक राष्ट्गीत गायनाचा कार्यक्रम-** प्रसंगी समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी







**दिनांक-13 ते 15 ऑगस्ट 2022 - 75 वा स्वातंत्र्य दिन महोत्सवा निमित्ताने कार्यक्रम**






चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयामार्फत वैजापूर येथे राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रम शाळा, वैजापूर येथे या "हर घर तिरंगा" उपक्रमांतर्गत रॅली काढण्यात आली व घरोघरी राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले.








**दिनांक-19/09/2022- महाविद्यालय,चोपडा येथे पेटंटधारक प्राध्यापकांचागुणगौरव सोहळा** -

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे पेटंटधारक गुणवंत प्राध्यापकांचा गुणगौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. "आंतरवैयक्तिक हिंसाचाराचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम तपासण्याचा एक अभिनव मार्ग " या शोधनिबंधावर प्राचार्य डॉ.पी.एस. पाटील,प्रा.डॉ.जगदीश सोनवणे, प्रा.डॉ. घनश्याम जगताप आणि प्रा.डॉ.राहुल निकम यांना भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. हे क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव., सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे या विद्यापीठातील पहिलेच पेटंट आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.अश्विनीताई गुजराथी (सहसचिव, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल, चोपडा.)होत्या.कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मा.सौ.पुनमताई गुजराथी (अध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा.), मा.सौ.छायाताई गुजराथी (उपाध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा) प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य प्रा.डॉ. आशिष गुजराथी, मुख्याध्यापक अरुण संदानशिव ,प्राचार्य उदय ब्रम्हे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अनंत देशमुख यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.




या वेळी बोलतांना सत्कारार्थी डॉ.जगदीश सोनवणे यांनी शोधनिबंधाची संकल्पना व पेटंट बाबतची सखोल माहिती यांनी विद्यार्थ्यांना दिली. शोधनिबंधासाठी घेतलेले सातत्यपूर्ण प्रयत्न विशद केले. प्राचार्य डॉ. पी.एस. पाटील यांनी सत्कारार्थी या नात्याने पेटंटचे आजच्या काळातील महत्वपूर्णता विद्यार्थ्यांना समजवून सांगितली. सौ.अश्विनीताई गुजराथी यांनी संशोधन हे समृद्धीकडे जाण्याचा राजमार्ग असल्याचे नमूद करीत जास्तीत जास्त व्दियार्थ्यांनी संशोधन करावे असे आवाहन केले. पेटंटधारक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. सौ. पुनमताई गुजराथी यांनी समाजकार्यातील प्राध्यापकांना मिळालेले पेटंट हे आभिमानस्पद बाब असल्याचे स्पष्ट करत अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन

केले. प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदांणकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, सौ.छायाताई गुजराथी यांनी पेटंटधारक प्राध्यापकांचे अभिनंदन करीत विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी केले.आभारप्रदर्शन प्रा.डॉ.विनोद रायपुरे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी केले. सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक-02/10/2022- महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यकम-**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.राहुल निकम यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकत गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांचे जीवनविषयक तत्वज्ञान मानवाच्या विकासास उपकारक असल्याचे सांगितले. महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात स्वछता मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. पुढे एक आठवडाभर ही माहीम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून महाविद्यालयात राबविण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.डॉ.विष्णू गुंजाळप्रा.डॉ. अनंत देशमुख,प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे, प्रा.डॉ.मोहिनी उपासनी,प्रा.कल्पना सोनवणे यांच्यासह बहुसंख्य प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी उपस्थित होते






**दिनांक-07/10/2022- संशोधन पद्धती विषयावर कार्यशाळा संपन्न-** समाजकार्य महाविद्यालयात संशोधन सल्लागार समिती द्वारा आयोजित या कार्यशाळेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांचे हस्ते करण्यात आले. टी.वाय.बी.एस.डब्ल्यू.आणि एम. एस.डब्ल्यू.द्वितीय वर्ष या

वर्गाच्या विद्यार्थ्यांना या वर्षाच्या अभ्यासक्रमात लघुशोध प्रबंध करावा लागतो. या अनुषंगाने या विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीचे ज्ञान व्हावे , माहिती व्हावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत संशोधन विषयाची निवड या विषयावर प्रा. डॉ. विनोद रायपुरे , साहित्याचे परीक्षण प्रा. डॉ. विष्णू गुंजाळ,संशोधनाचे उद्देश प्रा. डॉ. मोहिनी उपासनी, संशोधनाची गृहीत कृत्ये प्रा.डॉ.राहुल निकम, तथ्य संकलन प्रा.डॉ.मारोती गायकवाड, तथ्य विश्लेषण प्रा.डॉ.उत्तम सोनकांबळे, संदर्भ ग्रंथ सूची प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन संशोधन सल्लागार समितीचे सदस्य प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ व प्रा. डॉ.विनोद रायपुरे यांनी केले होते. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयोग होणार आहे असे मत प्राचार्य डॉ.सौंदाणकर यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेचे सुत्र संचलन आणि साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणा-या सर्व प्राध्यापकांचे प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ यांनी आभार व्यक्त केले





जळगाव तरुण भारत

Main Edition | 2022-10-09 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

**चोपडा समाजकार्य महाविद्यालयात 'संशोधन पद्धती'वर कार्यशाळा**

**चोपडा :** येथील भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालयात संशोधन सल्लागार समितीद्वारा आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांचे हस्ते करण्यात आले.

टी.वाय.बी.एस.डब्ल्यू.आणि एम.एस.डब्ल्यू.द्वितीय वर्ष या वर्गाच्या विद्यार्थ्यांना या वर्षाच्या अभ्यासक्रमात लघुशोध प्रबंध करावा लागतो. या अनुषंगाने या विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीचे ज्ञान व्हावे, माहिती व्हावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत संशोधन विषयाची निवड या विषयावर प्रा.डॉ.विनोद रायपुरे, साहित्याचे परीक्षण प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ, संशोधनाचे उद्देश प्रा.डॉ.मोहिनी उपासनी, संशोधनाची गृहीत कृत्ये प्रा.डॉ.राहुल निकम, तथ्य संकलन प्रा.डॉ.मारोती गायकवाड, तथ्य विश्लेषण प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे, संदर्भ ग्रंथ सूची प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रमाणे वरील विषयावर साधन व्यक्ती म्हणून या प्राध्यापकांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन संशोधन सल्लागार समितीचे सदस्य प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ, प्रा.डॉ.विनोद रायपुरे यांनी केले होते.

या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयोग होणार आहे, असे मत प्राचार्य डॉ.सौंदाणकर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचलन आणि साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ यांनी आभार मानले.

Powered by iDocuments

**दिनांक 15/10/2022- "वाचन प्रेरणा दिवस व 90 वा सामाजिक न्याय स्थापना दिवस" साजरा**


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. या वेळी विचारपीठावर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा विविवी सहा कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशिष गुजराथी, विविवी कार्यक्रम अधिकारी प्रा.नारसिंग वळवी हजर होते. यासोबत उमवी समाजकार्य विभाग अभ्यास मंडळ अध्यक्ष प्रा.डॉ.विनोद रायपुरे, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती समन्वयक प्रा.डॉ.अनंत देशमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे, ग्रंथपाल प्रा.कल्पना सोनावणे इ.हजर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा.डॉ.आशिष गुजराथी यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. आजच्या कार्यक्रमाची आवश्यकता स्पष्ट करीत सामाजिक न्याय विभागाचे कार्य थोडक्यात विद्यार्थ्यांसमोर मांडले. आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचण्याचे आणि आपल्या वाढदिवसाला महाविद्यालयात पुस्तक भेट देण्याचे आवाहन केले.प्रा.डॉ.विनोद रायपुरे यांनी वाचन संस्कृतीचे महत्व पटवूनदिले "वाचाल तर वाचाल " या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषवाक्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सामाजिक न्याय विभागाची

उपयोगिता सांगितली. प्रा.डॉ.राहुल निकम यांनी महापुरुषांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकीत वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सामाजिक न्याय विभागाचे कार्य हे समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी, अधिकाधिक सक्षम करण्यासाठी असल्याचे सांगितले. प्रा.कल्पना सोनवणे यांनी महाविद्यालयातील विविध पुस्तकांची माहिती विद्यार्थ्यांना दिली व या सुसज्ज ग्रंथालयाचा लाभ घेण्याचा आवाहन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी अनिल बिविस्कर यांनी नेहरू युवा केंद्र,चोपडा या कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या पुस्तिका मोफत वाटल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छादिल्या. अधिकाधिक वाचन करून जीवन समृध्द करण्याचे आवाहन केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. नारसिंग वळवी यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी हजर होते.



**दिनांक 11/11/2022- "एरंडोलविभागीय आंतर महाविद्यालययीन क्रीडा स्पर्धा "**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चोपडा येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत पाटील हितेश सखाराम ट्रिपल जम्प स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

**दिनांक 12/11/2022- "पथनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा "** ऑनलाईन पथनाटय **प्रशिक्षण कार्यशाळा**
वेळ- सकाळी ठीक ११ ते १२ वा. साधन व्यक्ती *श्री दिपक सैंदाणे, पुणे *श्री किरण बागुल, नासिक







**दिनांक 21/11/2022- महाविद्यालयाच्या Internal Exam घेण्यात आल्यात.**

**दिनांक-26 नोव्हेंबर 2022 - "संविधान गौरव दिवस" कार्यक्रम उत्साहात संपन्न -**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे 73 व्या संविधान दिनानिमित्ताने " भारतीय संविधान आणि सद्यस्थिती " या विषयावर विषेश व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आशिष गुजराथी होते. या वेळी विचारपीठावर रासेयो विभागाचे कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी, कार्यक्रम व्याख्याते डॉ.उत्तम सोनकांबळे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल निकम यांनी केले भारतीय संविधानावर आणि बाबासाहेबांच्या मानवतावादी कार्यावर प्रकाशझोत टाकत त्यांच्या कार्यप्रती कृतज्ञता प्रकट केली. या वेळी सामूहिकरित्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या वेळी 26 /11/2008 च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी व्याख्याता म्हणून बोलतांना प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या संविधानाचे महत्त्व सांगितले. संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या हक्क आणि अधिकारांची मानवी जीवनातील उपयोगिता सांगितली. संविधान समजून घेण्यासाठी संविधान वाचण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. प्रा.नारसिंग वळवी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेले संविधान हे सर्वांकरिता उपयुक्त असल्याचे नमूद केले. उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी अध्यक्षीय मनोगतातून सर्व विद्यार्थ्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती कृतज्ञता प्रकट केली. या वेळी विद्यार्थी विकास विभागामार्फत आर्थिक दुर्बल घटक योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप उपस्थित सर्व प्राध्यापकांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. सर्वांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राहुल निकम यांनी केले. आभारप्रदर्शन रासेयोच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.संबोधी देशपांडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी हजर होते





**दिनांक-28 नोव्हेंबर 2022 ते 4 डि संबर,2022 - "ग्रामिण शिबीर" कार्यक्रम उत्साहात संपन्न -**

प्रथम वर्ष बी.एस.डब्ल्यू. व एम.एस.डब्ल्यू. या अभ्यासक्रमाचे "ग्रामिण शिबीर" हे निमगव्हाण ता.चोपडा येथे घेण्यात आले.







समाजकार्य विद्यालयाचा MSW-I चा विद्यार्थी आकाश सिरसाळे यास स्टेट लेवल पावर लिफ्टिंग गोल्ड मेडल प्राप्त झलेया यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार् ., उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदातर्फ मनःपूर्वक अभिनंदन.



**दिनांक- 06 डिसेंबर 2022 महापरिनिर्वाण दिन-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 66 व्या महानिर्वाण दिना निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला डॉ.आशिष गुजराथी यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




**दिनांक- 09 डिसेंबर 2022 महापरिनिर्वाण दिन-**

सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय भडगाव* येथे आयोजित एरंडोल विभाग *आंतर महाविद्यालयीन शक्ती तोल व शरीरसौष्ठव क्रीडा* स्पर्धेमध्ये आपल्या *समाजकार्य महाविद्यालय चोपडा* येथील *एम. एस.डब्ल्यू. प्रथम वर्षाचा* विद्यार्थी *आकाश आनंदा शिरसाळे शक्ती तोल स्पर्धे अंतर्गत *द्वितीय* आणि शरीरसौष्ठव क्रीडा स्पर्धेमध्ये *तृतीय* आला आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदांनकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी, क्रीडा शिक्षक डॉ. मारोती गायकवाड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



